डोणगाव व रिसोड परिसरातील नुकसानीबाबत खासदार शरदचंद्र पवार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र
>> पान 2

राज्यात पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा
>> पान 3

अतिसारावर नियंत्रणासाठी चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे ओआरएसचे वाटप, 0 ते ५ वर्षे वयोगटातील १९०५३ बालके
>> पान 4

**सुविचार**
नेहमी सकारात्मक विचार करा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com  मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 300 ■ शनिवार, दि. 12 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



केडी - द डेव्हिल चित्रपटाच्या प्रमोशनल इव्हेंटमध्ये शिल्पा शेट्टीनं मराठी भाषेच्या वादावर बोलणं टाळलं
आतील पान

# शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळ यादीत

## रायगड, शिवनेरीसह महाराष्ट्रातील ११, तमिळनाडूतील एका किल्ल्याचा समावेश

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रासाठी एक अभिमानाची बातमी असून छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, प्रतापगड, पन्हाळ्यासह ११ किल्ले आहेत तर तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्याचा समावेश आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत सध्या भारतातील ४२ वारसा स्थळांचा समावेश आहे. त्यापैकी अजिंठा लेणी, वेरुळची लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई व्हिक्टोरियन अँड आर्ट डेको एन्सेबल आणि एलिफंटा केव्ह्ज या पाच स्थळांचा या आधीच समावेश होता. त्यामध्ये आता मराठा लष्करी भूप्रदेश म्हणून शिवरायांच्या १२ किल्ल्यांचा समावेश आहे.

रायगड, प्रतापगड, राजगड, पन्हाळ्यासह राज्यातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील एक अशा एकूण १२ किल्ल्यांचा समावेश आहे. या किल्ल्यांचा समावेश व्हावा म्हणून गेल्या वर्षी भारत सरकारने युनेस्कोकडे मागणी केली होती.

जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आलेले हे सर्व किल्ले सतराव्या शतकात बांधले गेलेले आहेत. हे किल्ले मराठा सैन्याच्या असामान्य लष्करी व्यवस्थेचा आणि अभेद्य तटबंदीचा भक्कम पुरावा आहेत.

कोणत्या किल्ल्यांचा यादीत समावेश

रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी जिंजी.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी युनेस्कोच्या या निर्णयाची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांची युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याची गोष्ट ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानास्पद असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. यासाठी त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष प्रयत्न केल्याचं म्हटलं. तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री आणि राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांचे यासाठी सहकार्य लाभल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

# राज्यातील प्रत्येक शेताला रस्त्यासाठी समग्र योजना आणणार

दैनिक आपला विदर्भ

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : उपायोजनांसाठी समितीची स्थापना**

**मुंबई/प्रतिनिधी** : प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने - आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना शासन आणणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल, ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेचा उत्तरात केली.

शेतरस्त्यांच्या बाबत सदस्य अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुमित वानखेडे यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेत रस्त्यांच्या समग्र योजनांबाबत गठीत समिती एक महिन्याच्या आत शासनाला उपाययोजनांचा अहवाल सादर करेल. शेत रस्ते करताना कौशल्यावर आधारित काम असल्यास यासंबंधी असलेल्या योजनांच्या समन्वयातून करणे, तसेच अन्य योजनांचा निधी एकत्रित करीत शेतरस्ते पूर्ण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. गावांमधील रस्त्यांसाठी असलेल्या २५- १५ योजनेतील ५० टक्के निधी शेत रस्त्यांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.या सुचनेच्या उत्तरात



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेत रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये अपील उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत संपवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. वाटप पत्रात शेतकऱ्यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यापुढे शेतरस्ता कमीत कमी १२ फूट रुंदीचा करण्यात येईल. जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेत रस्त्यांना क्रमांक देण्याची कार्यवाही करण्यात येईल.शेतरस्ते निर्मितीबाबत रोजगार हमी योजना, ग्रामविकास व महसूल विभाग यांच्याशी चर्चा करून स्वतंत्र लेखा शीर्ष निर्माण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. कालबद्ध कार्यक्रम राबवून शेत रस्ते पूर्ण करण्यात येतील, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# राज्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत संयुक्त बैठक घेणार : सार्वजनिक बांधकाम मंत्री



**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून यासंदर्भात लवकरच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभा सदस्य विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या दुर्दैवी अपघातात प्रवाशांचा मृत्यू प्रकरणी लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना मंत्री भोसले बोलत होते.

मंत्री भोसले म्हणाले, रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रोड सेल्फी असिस्ट आधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे रस्त्यावरील विविध धोकादायक ठिकाणांची प्रत्यक्ष छायाचित्रांसह नोंद घेतली जाते. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा रस्ता सुरक्षा समिती गठीत करण्यात आली असून यामध्ये तांत्रिक अधिकाऱ्यांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यातील रस्ते अपघात आणि आवश्यक उपाययोजना संदर्भात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक घेऊन आवश्यक उपाययोजना राबवण्यात येतील. तसेच महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणांवर तांत्रिक सुधारणा, संकेतचिन्हे, गती



नियंत्रण यंत्रणा, वळणांवरील संरक्षक उपाययोजना सारख्या आवश्यक पायाभूत सुधारणा करण्यात येतील, असेही मंत्री श्री. भोसले यांनी यावेळी सांगितले.या चर्चेत सदस्य सुरेश धस, बाबासाहेब देशमुख, अमोल जावळे, मनोज कायंदे, हिकमत उढाण आणि शेखर निकम यांनी सहभाग घेतला.

# चांगल्या कामासाठी कितीही गुन्हे दाखल होऊ दे; संजय गायकवाड

**मुंबई/प्रतिनिधी** : आमदार निवासातील कँटीनमध्ये मिळणाऱ्या अन्नाच्या दर्जाबाबत नाराजी व्यक्त करत शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी एका कँटीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला होता. या घटनेमुळे मोठा राजकीय व सामाजिक संताप व्यक्त करण्यात आला असूनही, अद्याप पोलिसांकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आज प्रतिक्रिया देताना म्हटलं, ''या प्रकरणात पोलिसांनी निश्चितपणे चौकशी केली पाहिजे. अशा प्रकारच्या घटनांसाठी कोणतीही औपचारिक तक्रार आवश्यक नसते. जर गुन्हा दखलपात्र असेल, तर पोलीस स्वत:हून कारवाई करू शकतात.'' त्याचबरोबर विरोधकांनी वेगवेगळ्या ठिकाणी आमदार गायकवाड यांच्याविरोधात तक्रार देण्याचा प्रयत्न केला, त्यावर बोलताना संजय गायकवाड म्हणाले, मी चांगलं काम केलं चांगल्या कामासाठी कितीही गुन्हे दाखल झाले तरी आय डोन्ट केअर. त्याचबरोबर आमदार संजय गायकवाड यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.

माझ्यावर गुन्हे दाखल झाले तरी आय डोन्ट केअर

मी कुठलाही मोठा गुन्हा केलेला नाही मी चांगल्या गोष्टीसाठी सौम्य मारहाण केली आणि चांगल्या गोष्टीसाठी कितीही माझ्यावर गुन्हे दाखल झाले तरी आय डोन्ट केअर असं म्हणत आमदार संजय गायकवाड यांनी विरोधकांना पुन्हा एकदा ठणकावून सांगितले आहे.

एनसी दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

संजय गायकवाड यांच्याविरोधात अदखलपात्र म्हणजे एनसी दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मरीन ड्राईव्ह पोलिसांकडून एनसी दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. संजय गायकवाड यांनी कँटीन कर्मचाऱ्याला मारहाण करून धमकी दिल्याचा प्रकार समोर आला होता. आता संजय गायकवाड यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.



मला कृत्याचा पश्चाताप नाही

संजय गायकवाड यांनीदेखील स्वत:च्या कृतीचे समर्थन केले होते. माझा मार्ग चुकला तरी मी जे केले त्याचा पश्चाताप नाही. किंबहुना मी मारहाण केल्यामुळेच निकृष्ट अन्न पुरवणाऱ्या कँटिनवर कारवाई झाली. मी फक्त जराशी मारहाण केली. त्यामुळे एनसी होऊ शकते. हा फार मोठा गुन्हा नाही. मलाही कायदा माहिती आहे. मी याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना भेटून माहिती देणार आहे. त्यांना मी दोषी वाटत असेन तर मी ते देतील ती शिक्षा भोगायला तयार आहे, असे संजय गायकवाड यांनी म्हटले होते.

## शनि शिंगणापूर देवस्थानमधील आर्थिक अनियमिततेबाबत दोषींवर फौजदारी गुन्ह्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील शनि शिंगणापूर देवस्थानमध्ये आर्थिक अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचे धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून आलेल्या अहवालात स्पष्ट झाले आहे.याप्रकरणी संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बाह्य तपास यंत्रणांची नियुक्ती करण्याचे निर्देशही दिले जातील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधी सुचनेच्या उत्तरात सांगितले. सदस्य विठ्ठल लंघे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित मांडली होती.

यावेळी सदस्य सुरेश धस यांनी चर्चेत सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देवस्थानमध्ये बनावट ॲप आणि पावत्यांद्वारे देणगी वसुल करून तसेच हजारो बनावट कर्मचाऱ्यांची नोंद करून गैरव्यवहार झाल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट झाले आहे. चौकशी समितीच्या अहवालानुसार, संस्थानच्या विविध विभागांत २४४७ बनावट कर्मचारी दाखवण्यात आले. त्यांच्या नावाने पगाराचे पैसे काही अन्य व्यक्तींच्या खात्यांत वळते करण्यात आले. रुग्णालय विभागात ३२७ कर्मचारी दाखवले गेले, प्रत्यक्षात केवळ १३ कर्मचारी उपस्थित होते. अस्तित्वात नसलेल्या बागेच्या देखभालीसाठी ८० कर्मचारी, १०९ खोल्यांच्या भक्तनिवासासाठी २०० कर्मचारी, १३ वाहनांसाठी १७६ कर्मचारी, प्रसादालयात ९७ कर्मचारी दाखवण्यात आले होते. इतर विभागांमध्येही असेच बनावट कर्मचारी दाखवण्यात आले आहेत.

# दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी धोरणात्मक सहकार्याच्या दिशेने ठाम पाऊल

- मृद व जलसंधारण योजनांसंदर्भात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक
- जलसंधारणात लोकसहभाग महत्त्वाचा; मंत्री संजय राठोड यांचे प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**मुंबई** : राज्यातील मृद व जलसंधारण विभागाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच धोरणात्मक सहकार्याच्या उद्देशाने विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवून योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात मार्गदर्शन केले.

त्यांच्यासह सचिव श्री गणेश पाटील, श्रीमती मृदुला देशपांडे (उपसचिव, मृद व जलसंधारण विभाग), श्री रणदिवे (मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट क्षेत्र विकास, पुणे) प्रमुख उपस्थित होते. या बैठकीला श्रीमती अपर्णा पाठक, कोमल धस, शिरीष कुलकर्णी, रमेश भिसे, संतोष राऊत, लतिका राजपूत, अरुण शिवकर, मंगल कुलकर्णी, कल्पेश कुलकर्णी, अश्लेषा खंडागळे, तसेच श्रीमती सुनिता मोरे यांची ऑनलाइन उपस्थिती होती. बैठकीच्या सुरुवातीस राज्यातील दुष्काळी भागांमध्ये अद्यापही मूलभूत पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न गंभीर असल्याचे अधोरेखित करताना मंत्री संजय राठोड म्हणाले, ''दुष्काळमुक्त महाराष्ट्र हे आपले सामूहिक ध्येय असले पाहिजे. जलसंधारणात लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे.''

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जलसंधारणाच्या योजनांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग वाढवण्यासाठी काही ठोस उपाय सुचवले. ''काम करू इच्छिणाऱ्या संस्थांसाठी आपण छोटे-छोटे युनिट तयार करू. उपसभापती कार्यालयाकडून अशा १५ विश्वासार्ह स्वयंसेवी संस्थांची यादी दिली जाईल. त्या संस्थांना पुढील कामात सहभागी करून घेतले जाईल,'' असे त्या म्हणाल्या.

त्याचबरोबर, जल व मृदसंधारण





क्षेत्रात आदर्श काम करणाऱ्या गावांची सादरीकरणे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले. राज्यभरातील कार्यरत स्वयंसेवी संस्थांसाठी एक राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित करण्याचा प्रस्तावही डॉ. गोऱ्हे यांनी मांडला.

विशेष म्हणजे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचनाही दिल्या. ''सामाजिक संस्थासाठी नियमावली बनवून सर्वसमावेशक धोरण ठेवावे. त्यामध्ये लाडक्या बहिणी, एकल महिला यांना जल व मृदसंधारणाच्या कामात सहभागी करून घेता येईल. यामुळे त्यांना आर्थिक व सामाजिक स्थैर्य प्राप्त होईल,'' असे त्या म्हणाल्या.

तसेच भटक्या व विमुक्त समाजासाठी विशेष उपक्रम तयार करून त्यांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात यावा, अशी सूचना त्यांनी केली. याशिवाय, ''चौथ्या महिला धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करताना, त्यानुसार विभागाच्या योजना व धोरणे तयार करावीत,'' असेही त्या स्पष्टपणे नमूद केले.


या बैठकीत पुढील काळात केवळ योजना सादरीकरणापुरते मर्यादित न राहता ''क्रियान्वयन, मूल्यांकन आणि लोकसहभाग'' या तीन मुख्य मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करून धोरणात्मक बैठका घेण्यावर एकमत झाले. भविष्यात पावसाचे प्रमाण, भूजल पातळी, शाश्वत सिंचन योजना आणि गावस्तरावर महिला पाणी समित्यांचा सहभाग यावरील सादरीकरणांची मालिका घेण्याची कल्पनाही बैठकीत मांडण्यात आली.

## घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो. आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

# डोणगाव व रिसोड परिसरातील नुकसानीबाबत खासदार शरदचंद्र पवार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे व माधव शेवाळे यांच्या निवेदनाची दखल







**डोणगाव/प्रतिनिधी :** परिसरात २५ व २६ जून रोजी दरम्यान झालेल्या अतिवृष्टीने शेतकरी वर्ग हा पूर्णता उद्ध्वस्त झाला आहे. शेती खरडून गेल्याने उत्पन्नाचे साधन नाही. राहत्या घरांची पडझड झाली आहे. अशा नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष गोपाल आखाडे व रिसोड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे माधव शेवाळे यांनी माजी माजी केंद्रीय कृषी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांना निवेदनाद्वारे केली होती.सदर निवेदनाची दखल घेत केंद्रीय माजी कृषीमंत्री तथा खा.शरदचंद्र पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देत मेहकर तालुक्यातील डोणगाव व रिसोड तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी, यासाठी पत्र दिले आहे.

खासदार शरदचंद्र पवार यांनी डोणगाव व रिसड तालुक्यातील नुकसानी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यासह डोणगाव व वाशीम जिल्ह्यातील रिसोड परिसरात २५ व २६ जून २०२५ रोजी अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे आणि घरांचे नुकसान झाले आहे.या संदर्भात दोन निवेदने मला प्राप्त झाली आहेत. दोन्ही निवेदनात नमूद केलेली परिस्थिती संक्षिप्त स्वरुपात मांडत आहे. कृपया अवलोकन व्हावे. बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव परिसरात पावसामुळे शेतीसाठी वापरण्यात येणारे शेकडो हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. अनेक कुटुंबांचे घरातील साहित्य, अन्नधान्य, अनावरांचे चारा व बियाणे वाहून गेले आहे.शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक हातचे गेले असून त्यांना नव्याने शेती करणेही शक्य होत नाही.सुमारे २५० पेक्षा अधिक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत.तर, वाशीम जिल्ह्यातील रिसोड परिसरातील ३४३ हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्रातील पिकांचे ८० ते १०० टक्के नुकसान झाले आहे.सोयाबीन, मका यासारख्या पिकांची प्रचंड हानी झाली आहे. अनेक शेतकऱ्यांचे घरे कोसळली असून जनावरांचे देखील नुकसान झाले आहे.सुमारे ५०० हून अधिक शेतकरी बाधित झाले आहेत. तरी आपणास विनंती आहे की,

डोणगाव व रिसोड परिसरातील बाधित शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून अहवाल तयार करण्यात यावा अहवालाच्या आधारे शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी.शेतकऱ्यांच्या कुटुंबांना अन्नधान्य, निवारा, बियाणे, खत, व जनावरांसाठी लागणारी मदत त्वरीत पुरवण्यात यावी. या संदर्भात प्राप्त झालेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल सुभावराव आखाडे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे युवक तालुकाध्यक्ष माधव शेवाळे यांची दोन्ही लेखी निवेदने सोबत ओडत आहोत. तरी आपण या संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा लक्षात घेऊन सहानुभूतीने व तातडीने निर्णय घ्यावा.असे पत्र दिले आहे.

# रस्त्यावर वाहन उभे करून वाहतूक कोंडी,लोकांच्या सुरक्षितता धोक्यात

## नियमांचे उल्लंघन होत असून सुद्धा प्रशासनाची बघ्याची भूमिका!



**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी :** ढाणकी येथील बाळासाहेब ठाकरे चौक ते संविधान चौक पर्यंत ड्रेन चे काम चालू असून ड्रेन झालेल्या ठिकाणची काढलेली काळी माती तशीच रस्त्यावर टाकल्यामुळे पाण्याने चिकल होत असल्याने नागरिक वहाने रोड वर लावत आहे, तर काही ठिकाणी ड्रेन वर दुकाने थाटून आपले दुकान रोड पर्यंत आणल्यामुळे मैन चौकात वाहतूक कोंडी करत आहे यावर ना बांधकाम विभाग व नगरपंचायत ना? पोलीस प्रशासन लक्ष देत आहे, वाहतूक कोंडीमुळे लोकांना गैरसोय होऊन अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. रस्त्यावर गाड्या उभ्या करून वाहतूक कोंडी करणे, ही एक गंभीर समस्या असून लोकांना त्यांच्या नियोजित ठिकाणी वेळेवर पोहोचायला अडचणी येत आहे तर इतर वाहनचालकांना गाड्या चालवताना अडचणी येत आहे.

भारतीय मोटार वाहन कायद्यानुसार, रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी वाहन उभे करणे किंवा थांबवणे हे नियमांचे उल्लंघन असून सुद्धा पोलीस प्रशासन यावर कार्यवाही करताना दिसत नाही.यामुळे रस्त्यावर चालणाऱ्या लोकांच्या सुरक्षितता''धोक्यात आली आहे''

## गुजरात पूल दुर्घटना : मृतांचा आकडा १७ वर तर ३ जणांचा शोध अजूनही सुरू, ४ अधिकारी निलंबित

गांधीनगर: वडोदरा आणि आणंदला जोडणाऱ्या ४० वर्षे जुन्या गंभीरा पुलाचा काही भाग महिसागर नदीत कोसळल्याने आतापर्यंत १७ जणांचा बळी गेला आहे, ज्यात एकाच कुटुंबातील अनेकांचा समावेश आहे.मृतांचा आकडा वाढत असताना, अजूनही ३ जण बेपत्ता असून त्यांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. तर, या प्रकरणात आता ४ अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे.

बुधवारी (दि.९) सकाळी पाद्रा शहराजवळील गंभीरा गावाजवळ घडलेल्या या भीषण दुर्घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे.या घटनेनंतर गुजरात सरकारने तातडीने कठोर पाऊले उचलत रस्ते आणि इमारत विभागाच्या चार अभियंत्यांना निलंबित केले आहे.

## केडी - द डेव्हिल चित्रपटाच्या प्रमोशनल इव्हेंटमध्ये शिल्पा शेट्टीनं मराठी भाषेच्या वादावर बोलणं टाळल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या महाराष्ट्रात मराठी भाषेबद्दल वाद सुरू आहे. मराठी भाषेवरून आगामी चित्रपट केडी द डेव्हिलच्या कार्यक्रमात संजय दत्तला याबद्दल एक प्रश्न विचारण्यात आला होता. संजय दत्त म्हणाला की, त्याला प्रश्न समजला नाही, तर शिल्पा म्हणाली की, ती महाराष्ट्राची मुलगी आहे आणि काहीही बोलून वाद निर्माण करू इच्छित नाही. ''आज आपण केडीबद्दल बोलत आहोत. त्यामुळे जर तुम्हाला केडी व्यतिरिक्त कोणत्याही वादात पडायचे असेल तर आम्ही त्याचे प्रमोशन करणार नाही. हा चित्रपट आधीच बहुभाषिक आहे, आम्ही तो मराठीतही डब करू शकतो.''

केडी - द डेव्हिलचं पाच महानगरांमध्ये टीझर लॉन्च करण्याची योजना आखण्यात आली होती. १० जुलैपासून मुंबई आणि हैदराबाद येथून त्याची सुरुवात केली गेली होती. आज ११ जुलै रोजी चेन्नई आणि कोची येथे होणार आहे आणि १२ जुलै रोजी बंगळुरू येथे त्याचा समारोप होईल. केडी - द डेव्हिल चित्रपट केव्हीएन प्रॉडक्शन्स प्रस्तुत आणि प्रेम दिग्दर्शित आहे. हा चित्रपट १९७० च्या दशकातील बंगळुरूतील सत्य घटनांवर आधारित आहे. या चित्रपटात ध्रुव सरजा, संजय दत्त, शिल्पा शेट्टी, नोरा फतेही, रमेश अरविंद आणि व्ही. रविचंद्रन यांच्या विशेष भूमिका आहेत. केडी - द डेव्हिल हा हिंदी, तमिळ, कन्नड, तेलुगू आणि मल्याळम भाषांमध्ये चित्रपटगृहांमध्ये रिलीज होणार आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारनं प्राथमिक शाळांमध्ये हिंदीला तिसरी भाषा म्हणून ठेवण्याची योजना आखली. यानंतर हा वाद सुरू झाला. विरोधकांनी याला जोरदार विरोध केला. यानंतर हा आदेश मागे घेण्यात आला. यानंतर मराठी भाषा न बोलणाऱ्या लोकांना मारहाण करण्याचे काही प्रकार देखील महाराष्ट्रात समोर आले. याशिवाय काही सेलिब्रिटींनी याबद्दल निषेध केला. तसेच हिंदुस्थानी भाऊंनी देखील यावर एक व्हिडिओ देखील बनवला होता. यानंतर त्याला देखील काही लोकांनी सोशल मीडियावर ट्रोल केलं होतं.

# शेतकऱ्यांच्या पिकाची नासाडी वन्य प्राण्यांनी उभे पीक केले फस्त

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**बिबी :** बिबी, किनगाव जटुट,भुमराळा परिसरात वन्य प्राण्यांची संख्या खूपच वाढली असून जंगली प्राण्यांचा जास्तच उद्रेक वाढला आहे त्यामुळे खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात खाऊन फस्त करत आहेत लोणार तालुक्यातील किनगाव जटुट येथील शेतकरी सय्यद हबिब सय्यद अहमद यांचे शेत देवानगर शिवारात गट नंबर ६८ मधे आहे. त्यांच्या शेतातील ८८ आर सोयाबीन निलगाय व हरीन वन्य प्राण्यांनी खाऊन टाकली असुन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे

बिबी, कीनगाव जटुट,भुमराळा महसूल मंडळात दर वर्षी पीक जमिनीच्या वर येताच वन्यप्राणी पिकाला खाऊन टाकतात खरिपाच्या पेरणीसाठी शेतकऱ्याला सावकाराचे ,बँकेचे कर्ज काढावे लागले ते येणाऱ्या पिकाच्या आधारावर फेडायचे असते

वन्यप्राणीही शेतकऱ्याचा पिच्छा सोडायला तयार नसून मोठ्या प्रमाणात नीलगाय , हरीन रानडुक्कर, माकड मोठ्या प्रमाणात पिकांची नासाडी करत आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकरी मेटाकुटीला आला असून चिंतातूर झाला आहे. खरीप हंगामात सुद्धा शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. तरी वन विभागाने वन्य प्राण्यांची बंदोबस्त करावा नाहीतर शेतकरी वनविभागाच्या अधिकाऱ्यांचा बंदोबस्त करायला मागेपुढे पाहणार नसल्याचे शेतकऱ्यांनी बोलुन दाखवले आहेत देखील शेतकऱ्यांनी केली आहे तात्काळ नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या विकासकांवरील कारवाईसाठी कायद्यात सुधारणा करणार : नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महापालिका क्षेत्रात इमारतींच्या विकासकांना महानगर पालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असते. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या विकासकांवर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र नगररचना अधिनियम कायद्यात सुधारणा करण्याकरिता अभ्यास गट स्थापन करण्यात येईल, अशी माहिती नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या इमारतींबाबत सदस्य राजन नाईक यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेचा चर्चेत सदस्य मुरजी पटेल, स्नेहा दुबे, मनीषा चौधरी यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, वसई - विरार महापालिका क्षेत्रात भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या इमारतींमध्ये नागरी सुविधांची कामे अडविली जाणार नाही. कुणालाही नळ जोडणीअभावी पाण्यापासून वंचित ठेवल्या जाणार नाही. नळ जोडणी देण्यासाठी उपाय योजना करण्यात येतील. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या विकासकांच्या अन्य गृहनिर्माण प्रकल्प तसेच इमारतींना मंजुरी दिली जाणार नाही. तसेच वसई - विरार महापालिकेत भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींमधील नागरिकांना शास्ती न लावण्याच्या सूचना देण्यात येतील. नागरिकांना मालमत्ता कर हा विकासकांकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल. याबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधित अधिकारी व विभागाची बैठक घेण्यात येईल, असेही नगरविकास राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले.

### ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम १५ जुलै रोजी शिवछत्रपती सभागृह रंगभवन येथे होणार




**सोलापूर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी यांच्या दि.८ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये उत्तर सोलापूर तालुक्यातील सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच/उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मध्ये सरपंच पदाच्या आरक्षणबाबत तरतुदी निश्चित केल्या आहेत. सदर नियमान्वये नियम २ अ मध्ये नेमून दिल्यानुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, खुला व महिला(अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरीकांचा मागास प्रवर्गाच्या स्त्रीयांसह) सरपंच पदे निश्चित करावयाची आहेत. त्यानुसार उत्तर सोलापूर तालुक्यातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दि.१५ जुलै २०२५ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता श्री.शिवछत्रपती सभागृह रंगभवन, सोलापूर येथे निश्चित करण्यात आला आहे. तरी सदर ठिकाणी आपण ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत कार्यक्रमास निश्चित केलेल्या दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे. जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या नोटीस बोडांवर व चावडीवर तसेच सार्वजनिक ठिकाणी डकवून प्रसिध्द करण्यात येत आहे, अशी माहिती उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील यांनी दिली.

### दुबईचा गोल्डन व्हिसा तब्बल ४ कोटींचा व्हिसा अवघ्या २३.३० लाखांवर

**मुंबई/प्रतिनिधी :** संयुक्त अरब अमिरातीच्या सरकारने गोल्डन व्हिसाचे नियम शिथिल केल्याची चर्चा आहे. याअंतर्गत, गोल्डन व्हिसा मिळविण्यासाठी आता दुबईमध्ये मालमत्ता किंवा व्यवसायात गुंतवणूक करण्याची आवश्यकता राहणार नाही. गोल्ड व्हिसा हा दीर्घकालीन निवासासाठीचा परवाना आहे, ज्याद्वारे इतर देशांतील लोकांना दुबईमध्ये राहण्याची, काम करण्याची आणि अभ्यास करण्याची सुविधा दिली जाते.

गोल्डन व्हिसाचे नियम शिथिल केल्याने मोठ्या संख्येने लोक दुबईमध्ये स्थायिक होऊ इच्छितात. अशा परिस्थितीत, तेथे प्रवेश पातळी आणि मध्यम श्रेणीच्या रिअल इस्टेट प्रॉपर्टीची मागणी देखील वाढेल. नवीन नियमानुसार, गोल्डन व्हिसा मिळविण्यासाठी, तुम्हाला सुमारे २३.३० लाख शुल्क भरावे लागेल, तर पूर्वी यासाठी ४ कोटी रुपये किंवा त्याहून अधिक गुंतवणूक करावी लागत असे. भारतातील श्रीमंतांसाठी ही फार मोठी रक्कम नाही. असो, अनेक बॉलिवूड स्टार आणि भारतीय सेलिब्रिटींचे दुबईमध्ये आलिशान बंगले आहेत. परंतु आता नवीन नियमांमुळे, देशातील उच्च मध्यमवर्ग आणि मध्यमवर्गीय देखील दुबईमध्ये स्थायिक होऊ इच्छित आहेत.

# राज्यात पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा

## पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे विधानसभेत निवेदन : असा निर्णय घेणारे देशातील महाराष्ट्र पहिले राज्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पशुपालन व्यवसायास 'कृषी व्यवसायाचा' दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६.४१ लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून सुमारे ७,७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे.

मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, या निर्णयानुसार राज्यातील वीज दर आकारणी, कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल. पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के पर्यंत सवलत देण्यात येईल व त्यासाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती विहित करण्यात येईल आणि कृषी प्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल.राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के आहे. राज्यातील पशुजन्य उत्पन्नाचा विचार करता भारतीय आरोग्य परिषदेने दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या प्रमाणाइतके अंडी व मांस उपलब्ध नाही. तसेच दुग्ध उत्पादनात राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता इतर राज्यांच्या तुलनेत कमी आहे. याशिवाय निती आयोगाच्या सन २०२१ च्या अहवालामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पद्धतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असून त्यावर उपाययोजना करुन शेतकरी, पशुपालकांच्या आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री श्रीमती



मुंडे यांनी यावेळी सांगितले.

## शिंदेंना वाचवणारी दिल्लीतील शक्ती कमजोर झालेय, ऑगस्ट महिन्यात काहीतरी मोठे घडेल: संजय राऊत

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी काळात एकनाथ शिंदे यांच्या जवळच्या लोकांवर तपास यंत्रणांकडून मोठी कारवाई होऊ शकते, असे भाकीत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे. एकनाथ शिंदे हे नुकतेच दिल्लीत जाऊन आले. यावेळी त्यांनी अमित शाह यांच्यासह अनेक बड्या नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या होत्या. त्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी अनेक खळबळजनक दावे केले आहेत.

एकनाथ शिंदे यांच्या जवळच्या काही लोकांवर भविष्यामध्ये नक्कीच कारवाया होणार आहेत. त्याप्रकारचे पुरावे केंद्रीय तपासयंत्रणांच्या हाती लागले आहेत. शिंदेंना वाचवणाऱ्या शक्ती दिल्लीत कमजोर होताना मला दिसत आहेत. एकनाथ शिंदे यांच्यापेक्षा दिल्ली जास्त मला माहिती आहे. केंद्रीय तपास यंत्रणांच्या कामाची पद्धत मला माहिती नाही. इन्कम टॅक्सची नोटीस मी गांभीर्याने घेत नाही. हा एक इशारा आहे. याच्यापेक्षा वेगळ्या घडामोडी ऑगस्टच्या अंतापर्यंत घडतील, असे मला संकेत आहेत. त्यामुळे या राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होऊ शकते, असे संजय राऊत यांनी म्हटले.

ज्यांना आता इन्कम टॅक्सची नोटीस आलेय, तो संबंधित मंत्री आहे, त्यांचा एक व्हिडीओ मला कोणीतरी पाठवला. त्यामध्ये हे मंत्री बाजूला पैशांच्या बॅगा घेऊन बसले आहेत. हे पुरावे सर्वत्र जात असतात. सरकारमध्ये आहात म्हणून आपल्याला कोणीही हात लावणार नाही, हा एक भ्रम असतो. हा भ्रम काही काळ टिकतो. हे पुरावे कुठेतरी गोळा होत असतात. योग्य वेळ येताच त्याच्यावर कारवाई होते, ती सगळ्यांवर होते. त्यापासून कोणीही वाचत नाही. सत्तेचं संरक्षण तात्पुरते असते. भविष्यात शिंदे गटाला या कारवाईला तोंड द्यावे लागेल. दिल्लीतील तुमचे संरक्षक जसजसे कमजोर होतात, अशावेळी तपासयंत्रणा त्यांच्याकडील सगळ्या फाईल्स उघडतात. ते आता हळूहळू सुरु झाले आहे. एकतर तुम्हाला पूर्णपणे शरणागत होऊन सरपटणाऱ्या प्राण्यासारखं सत्तेत राहावं लागेल. नाहीतर बऱ्याच तडजोडी कराव्या लागतील. मला वाटत नाही, एखाद-दुसरा नेता वगळता एकनाथ शिंदेंना कोणी संरक्षण देत असेल, असे संजय राऊत यांनी म्हटले.

## दरोड्यातील आरोपीस सहा तासात मुद्देमालासह अटक

### धनज पोलीसांची कामगिरी



दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** धनज पोलीस स्टेशन हद्दीत अज्ञात आरोपींनी घातलेला दरोडा ६ तासाच्या आत उघड करून आरोपीस गजाआड करण्यात आले आहे. प्राप्त माहितीनुसार ८ जुलै रोजी रात्री ९ वाजता दरम्यान चालक ज्ञानेश्वर माधवराव मोरे रा.अहिरवाडी हा अमरावती येथून अशोक लेलॅन्ड १८१५ वाहन क्र. एम.एच.१४ एल.एक्स.२२८० मधे पशुखाद्य भरुन वाशीम मार्गे जवळाबाजार जि. हिंगोली असे जात होता. अमरावतीचे बाहेर आल्यानंतर चालकाने विश्राती घेवून निघाला असता रात्री अंदाजे ३ वाजताच्या दरम्याण म्हसला फाट्याजवळ गतीरोधक असल्याने वाहनाचा वेग कमी केला. त्याचवेळी मागून एक पांढया रंगाची टाटा कंपनीची एम.एच.२६ पासिंग असलेली कार अज्ञात इसमांनी अशोक लेलॅन्ड वाहनाचे पुढे आडवी लावली. कारचा चालक कारमध्ये थांबला व ४ ईसम उतरले. त्यांनी अशोक लेलंडचे चालकाला खाली ओढून चाकुचा धाक दाखवुन त्याला तेथेच सोडून, अशोक लेलेन्ड १८१५ वाहन पशुखाद्यासह अंदाजे एकूण २५ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन घेवून गेल्याने आरोपीविरुध्द धनज पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. धनज पोलीस स्टेशनचे ठाणेदार भारत लसते यांनी तात्काळ तपास पथक तयार केले. चालकाच्या माहिती घटना व आरोपींचे वर्णन यावरुन तपासाची चक्रे फिरवून संशयीत आरोपी पांडूरंग तातेराव मेथे याची गोपनीय माहिती घेतली. मिळालेल्या माहितीवरुन तांत्रिक पध्दतीने तपास केला. तसेच वाहन घेवून गेलेल्या मार्गावरील मानोरा, दिग्रस, पुसद ठाणदारांना माहिती देवुन धनज पोलीस स्टेशनचे ठाणेदार धनज व स्टाफने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तत्परतेने दखल घेवून शिघ्रगतीने तपासचक्रे फिरवून घटनास्थळावरुन सुमारे १०० कि.मी. दूर गेलेला अशोक लेलॅन्ड वाहन पशुखाद्यासह ताब्यात घेवून, आरोपीनी गुन्ह्यात वापरलेल्या कारसह सर्व आरोपींना अटक केली आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, कारंजा उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक भारत लसंते, पोलीस उपनिरीक्षक शिंदे, अंमलदार गजानन वर, आशिष खाडरे, राजेश अंबुरे, अफसर रायलीवाले, मनोज डहाके, किरण गुहे, प्रफुल गावडे पुसद येथील सपोनि केदारे,शेंबडे, अंमलदार आकाश, भगत, मनोज, दातीर यांनी केली आहे.तपास पथकाला पुरस्कार देण्यात आला आहे.

## साथीचे आजार रोखण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी ॲक्शन मोडवर

### ग्रामीण भागात प्रत्यक्ष भेटी : तपासण्या व जनजागृती

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** सध्या पावसाळा सुरू झाल्याने जिल्ह्यात विविध साथीचे आजार उद्भवण्याची शक्यता लक्षात घेता जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पी.एस. ठोंबरे यांनी ॲक्शन मोडवर कार्यवाही सुरू केली आहे. त्यांनी तालुक्यातील अनेक लहान गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची स्थिती, आरोग्य सुविधांची पाहणी केली. गेल्या काही दिवसांपासून डॉ.ठोंबरे यांनी वाशीम, रिसोड, मालेगाव, कारंजा आदी तालुक्यांतील छोट्या खेड्यांमध्ये जाऊन प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचायांना आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्दे श दिले आहेत. त्यांनी गावकयांना



स्वच्छ पाणी पिण्याचा सल्ला दिला तसेच घराच्या आजुबाजुला साचणारे पाणी त्वरित काढून टाकावे, डास उत्पत्ती होऊ न देण्यासाठी औषध फवारणी करावी, लहान मुलांमध्ये होणारे जुलाब, उलट्या यांसारखे आजार लक्षात घेऊन त्वरित उपचार करावेत, असे निर्देश दिले.पाहणी दरम्यान डॉ. ठोंबरे यांनी आरोग्य विभागाच्या टीमना गावोगावी जाऊन लोकांना डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो या आजारांपासून बचावाचे उपायाबाबत जनजागृती करण्याचे निर्देश दिले. आरोग्य कर्मचायांना ओआरएस पावडर, झिंक टॅबलेट, प्राथमिक उपचार साहित्य पुरवण्याच्या सुचना दिल्या. याशिवाय प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला रुणांच्या नोंदी व्यवस्थित ठेवण्यास सांगितले आहे. कुठलाही साथीचा आजार आढळल्यास तातडीने जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आदेश त्यांनी दिले. जिल्हा आरोग्य अधिकायांच्या या तत्परतेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. जनतेनेही स्वच्छता व काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## शहरातील मादक पदार्थांच्या विक्रीविरुद्ध तात्काळ व प्रभावी उपाययोजना करा

### उमरखेडमध्ये चरस-गांजा व ऑनलाईन गेम्सवर सरसकट बंदी आणावी युथ मुवमेन्टची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** शहरातील बायपास, खरब मैदान, गव्हर्नमेंट हायस्कूल परिसर आणि इतर ठिकाणी चरस, गांजा व नायट्रोजन गोळ्यांची खुलेआम विक्री होत असल्याने तरुणाई नशेच्या गर्ते त अडकत असुन गॅगवार व खुना च्या घटना घटत असल्याचे चित्र समोर येत आहे तसेच, ऑनलाईन गेम्सच्या वाढत्या व्यसनामुळे तरुणांचे मानसिक स्वास्थ्य ढासळत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सामाजिक संघटन युथ मुव्हमेन्ट ऑफ महाराष्ट्र च्या कार्यकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्याकडे निवेदन सादर करून अंमली पदार्थांवर कठोर कारवाई व ऑनलाईन गेम्सवर सरसकट बंदीची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काही ठिकाणी रात्रीच्या वेळेस तरुणांच्या जमावात खुलेआम नशा केली जाते. यामुळे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नसून अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. यापूर्वी पोलिस प्रशासनाला तक्रारी देऊनही कारवाई न झाल्याची खंतही निवेदनात व्यक्त करण्यात आली.

चरस, गांजा व नायट्रोजन गोळ्यांच्या विक्रेत्यांविरुद्ध विशेष मोहिम राबवावी ,व्यसनाधीन तरुणांसाठी पुनर्वसन योजना कराव्या ,संवेदनशील भागात गस्त




वाढवून जमावावर नियंत्रण घालावे ,ऑनलाईन गेम्सवर सरसकट बंदी आणि याबाबत शासन पातळीवर ठोस धोरण आखावे,शाळा -महाविद्यालयां मध्ये जनजागृती मोहीम सुरू करावी अश्या मागणी निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

> हा विषय चिंताजनक असून यावर मी वरिष्ठ स्तरावर योग्य ती कारवाई करून नक्कीच पाठपुरावा करेल.
>
> **-उपविभागीय अधिकारी, उमरखेड**

निवेदन सादर करताना सोहल खान, साबीर नाईक, शाहीद खान, फेजान लाला, उमेर खान, अजीम अली, साकीब शेख, माजीद खान, जिदान शेख, अयान खान, सिबगत उल्ला आदी युवक उपस्थित होते. सदर निवेदनाच्या प्रति मा. गृहमंत्री, , पोलीस महासंचालक,पोलीस अधीक्षक, पोलीस उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आल्या.

# अतिसारावर नियंत्रणासाठी चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे ओआरएसचे वाटप, 0 ते ५ वर्षे वयोगटातील १९०५३ बालके

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राष्ट्रीय अतिसार नियंत्रण कार्यक्रम' अंतर्गत दिनांक २ जुन ते ३१ जुलै २०२५ पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत असुन या कालावधीत ० ते ५ वर्षाच्या बालकांना ओ.आर. एस.(ओरल रिहायड्रेशन सोल्यूशन) व झिंक गोळ्यांचे वाटप करण्यात येत असल्याची माहिती मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नयना उत्तरवार यांनी दिली.

चंद्रपूर मनपा कार्यक्षेत्रात ५ वर्षाखालील बालकांची एकुण संख्या (मुले - मुली) १९०५३ आहे. या सर्व बालकांना ओ. आर. एस. व झिंकची गोळी देऊन अतिसारामुळे होणारे बाल मृत्यू शुन्य करणे, हे या मोहिमेचे उद्दीष्ट आहे.अतिसारामुळे मुलांमध्ये निर्जलीकरण होऊन गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात, त्यामुळे या मोहिमेद्वारे योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

## अतिसाराची लक्षणे

बालक अधिक आजारी होत असेल.

अस्वस्थपणा, चिडचिडेपण डोळे खोल जाणे घटाघट पाणी पिणे,सतत तहानलेले असणे शौचद्वारे रक्त येत असल्यास ताप येत असल्यास.

अतिसाराची कारणे :

रासायनिक आणि उघडे पदार्थ शिळे अन्न सेवन दूषित पाणी पिणे अन्नाचे अपचन

आपण काय करू शकता:

आपल्यामुलांमध्येअतिसाराचीलक्षणेदिसल्यासत्वरितडॉक्टरांशीसंपर्कसाधा. आणि झिंकचा वापर करा. आपल्या मुलाला पुरेसे द्रव द्या. आपल्या परिसरातील आरोग्य कर्मचाऱ्यांशी संपर्क साधा आणि त्यांना सहकार्य करा

यासाठी गृहभेटीदरम्यान प्रत्येक बालकासाठी १ ओ.आर.एस. पाकीट हे बाळाला भविष्यात जुलाब, शौच झाल्यास वापरण्याकरीता पालकांना वापरण्याच्या माहितीसह देण्यात येत आहे.

या मोहिमेत मनपाच्या ७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी यांच्या नियंत्रणात १७० आशा स्वयंसेविकांद्वारे सदर मोहीम राबविण्यात येत असुन ० ते ५ वर्षाखालील बालकांच्या मातांना अतिसाराचा प्रतिबंध आणि व्यवस्थापन या विषयीची माहिती गृहभेटीदरम्यान देण्यात येत आहे. प्रत्येक आरोग्य केंद्रात ओ.आर.एसचे महत्व सांगणारे ओआरटी कॉर्नर स्थापित करण्यात आलेले आहे तसेच आरोग्य सेविका मार्फत आरोग्य पोषण सत्रात व शाळेत हात धुण्याच्या योग्य



पद्धतीची प्रात्यक्षिके दाखवुन महत्व समजाऊन सांगण्यात येत आहे.

या अनुषंगाने बालकांचा आजार कमी न झाल्यास अथवा अतिसाराचे प्रमाण आढळल्यास पालकांनी त्वरित जवळच्या महानगरपालिका आरोग्य केंद्र / दवाखाना / रुग्णालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नयना उत्तरवार यांनी केले आहे.

## विविध वृत्त...

### मनपातर्फे ६५ वर्षे जुनी जीर्ण इमारत जमीनदोस्त




दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** महापालिका क्षेत्रातील शिकस्त इमारतींपासून परिसरातील रहिवाशांच्या जीविताला निर्माण होऊ शकणारा धोका पाहता चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे कारवाई करण्यात येत असुन कोहिनूर स्टेडियम जवळील ६५ वर्षे जुनी जीर्ण इमारत जमीनदोस्त करण्यात आली आहे.

कोळसुजी पेकूजी मेश्राम यांच्या मालकीची ही इमारत असुन त्यांना सदर इमारत पाडण्याची नोटीस मनपातर्फे देण्यात आली होती. मात्र त्यांनी स्वतः काही हालचाल न केल्याने मनपाने कारवाई करून इमारत निष्कासीत केली आहे. पावसाळ्यात दरवर्षी महापालिका क्षेत्रातील जीर्ण व शिकस्त इमारती खाली करण्याची सूचना प्रशासनाकडून नोटीसद्वारे दिली जाते; मात्र मालमत्ताधारक जिवाची पर्वा न करता त्याच इमारतीत तळ ठोकून राहतात. यामुळे परिसरातील रहिवाशांच्या जिवालासुद्धा धोका निर्माण होतो. जीर्ण इमारतींचे पुन्हा एकदा वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून जीर्ण इमारती तातडीने जमीनदोस्त करण्याचे निर्देश आयुक्त विपीन पालीवाल यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सर्व्हे पूर्ण झालेल्या सर्व जीर्ण इमारतींना नोटीस देण्यात आली असुन नोटीस प्राप्त होऊनही जे धारक अश्या जीर्ण घरात राहत आहे त्यांच्यावर मनपाद्वारे कारवाई केली जात आहे. उपायुक्त संदीप चिद्रावार यांच्या मार्गदर्शनात सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी,नगर रचनाकार प्रतीक देवतळे,अतिक्रमण निर्मूलन पथक व नगर रचना विभागाने ही कारवाई पार पाडली.

### बेपत्ता महिला आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या सतर्कतेमुळे नातेवाईकांच्या स्वाधीन



दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** बेपत्ता महिला आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या सतर्कतेमुळे नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आली. अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी दिली. प्राप्त माहितीनुसार कारखेडा येथील महिला मंदा खंडारे ४ जुलैपासून मानोरा जातो म्हणून निघून गेली होती. परंतु,दोन-तीन दिवस तिचा पत्ताच लागत नसल्यामुळे भाऊ किशोर जाधव यांनी मानोरा पोलीस स्टेशन येथे मंदा खंडारे हरविल्याचा तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस पाटील यांच्या व्हाट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून सदर महिला ही कानशिवनी जिल्हा अकोला येथे असल्याची माहित पडली. पिंजर येथील आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख दिपक सदाफळे यांच्या सहकार्यामुळे सदर महिलेला पिंजर पोलीस स्टेशनला आणून मानोरा तहसीलदार संतोष यावलीकर, मानोरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रविण शिंदे यांना याबाबत माहिती दिली. ठाणेदार शिंदे यांनी सदर घटनेबाबत पोलीस पाटील यांना माहिती दिली. त्यानंतर सदर महिलेला नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. यासाठी वाशीम जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत व आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तथा समाजसेवक दिपक सदाफळे, मानोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण शिंदे व पोलीस पाटील व्हाट्सअॅप ग्रुपचे सहकार्य मिळाले.

### रेल्वे पोलिसाचा प्रामाणिकपणा! तब्बल ३०,००,००० रुपये किमतीचा चेक केला परत!

**मुंबई /प्रतिनीधी:** पोलीस प्रशासन जनतेच्या सुरक्षेसाठी नेहमीच तत्पर असतं. काही वेळा पोलिसांकडून होणाऱ्या गैरप्रकारांची देखील चर्चा होते. परंतु, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथील रेल्वे पोलिसांनी प्रामाणिकपणाचा अनोखा आदर्श निर्माण केला आहे. ९ जुलै रोजी कर्तव्यावर असताना सापडलेला तब्बल ३० लाख रुपये किमतीचा सही केलेला चेक आणि पासबुक प्रामाणिकपणे परत केलं आहे. त्यामुळे रमेश टाकळकर यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे दादासाहेब सानप यांची पुण्यतिथी साजरी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** स.व.पटेल स्मारक शिक्षण समितीचे माजी सचिव, कर्तृत्ववान,अष्टपैलू व्यक्तिमत्त्व स्व.उत्तमराव दादा उर्फ दादासाहेब सानप यांची पुण्यतिथी स.व.पटेल हायस्कूल लोणार मधे साजरी करण्यात आली. आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय भाऊसाहेब डोळे सर , प्रमुख पाहुणे म्हणून लोणार पोलीस स्टेशनचे इंगळे साहेब,चव्हाण साहेब,पर्यवेक्षक सांगळे सर उपस्थित होते.सर्वप्रथम कै. दादासाहेब सानप यांच्या



प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.भाऊसाहेब डोळे सर यांनी कै.दादासाहेब सानप यांच्या सामाजिक राजकीय व शैक्षणिक कार्याची विद्यार्थ्यांना माहिती दिली. याप्रसंगी इंगळे साहेब यांनी सर्वप्रथम विद्यार्थ्यांना बालसुरक्षा कायदा विषयक मार्गदर्शन केले.त्यानंतर विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाला सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णु बचाटे सर यांनी केले.

## कित्येक वेळा विनंती, अनेकदा पत्रव्यवहार पण प्रशासन ऐकेना, नीलेश लंके उपोषणाला बसले

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या १६० राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरण कामात प्रचंड दिरंगाई होत असून, या कामास सुरुवात करावी या मागणीसाठी खासदार नीलेश लंके आज शुक्रवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. निशाना लगाया तो शिकार होना ही चाहिये... अशा शब्दात खासदार डॉ. निलेश लंके यांनी प्रशासनावर निशाणा साधला आहे. नगर-मनमाड रस्त्याच्या दुरवस्थेमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी न्याय मिळावा यासाठी लंके यांच्या नेतृत्वाखाली आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र उपोषण सुरू करण्यात आले.

या रस्त्यावरील खड्डे, उखडलेले डांबर, अपूर्ण डांबरीकरण, आणि निकृष्ट जलनिचरा व्यवस्थेमुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. प्रवाशांसह वाहनचालकांनाही प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, काही नागरिकांनी जीवही गमावले आहेत. वेळोवेळी तक्रार करूनही प्रशासन दखल घेत नाही त्यामुळे आता खासदार लंके यांनी थेट मैदानात उतरत उपोषणाचा निर्णय घेतला.

## लाच घेताना कंत्राटी लाईनमन चतुर्भूज पाचशे रुपयांची लाच घेणे भोवले : वाशीम एसीबीची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :**सौर कृषी पंप योजने अंतर्गत सौर पंपाचे कृषी सर्वेक्षण पूर्ण केल्याचा मोबदला म्हणून ५०० रुपयांची लाच घेताना वीज वितरण कंपनीचा कंत्राटी कर्मचारी दिलीप पंढरी नंदापुरे याला वाशीम लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ९ जुलै रोजी रंगेहात अटक केली. सदर प्रकाराबाबत आरोपीविरुद्ध वाशीम शहर पोलीस स्टेशन येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार तक्रारदार यांच्या वडिलाच्यानावे नावे मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत सौर पंपाचे कृषी सर्वेक्षण पूर्ण केल्याचा मोबदला म्हणून वीज वितरण कंपनीचे कंत्राटी कर्मचारी दिलीप पंढरी नंदापुरे यांनी ७००रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. ९ जुलै रोजी आरोपीने पंचांसमक्ष तडजोड अंती ५०० रुपयांची लाच सिव्हील लाईन परिसरातील वीज वितरण कंपनी कार्यालया परिसरात तक्रारदार यांच्याकडून स्वीकारताना वाशीम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली.सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध वाशीम शहर पोलीस स्टेशन येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यत आला आहे. सदर कारवाई वाशीम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक अलका गायकवाड, पोलीस उपअधीक्षक जगदीश परदेशी,नितीन टवलारकर, विनोद मार्कंडे, राहुल व्यवहारे, योगेश खोटे, विनोद अवगळे, नाविद शेख यांच्या पथकाने केली.

## १५० दिवस कार्यक्रमाअंतर्गत मनपाच्या विविध विभागांनी सुरु केला कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार सुरु असलेल्या ''१५० दिवस कार्यक्रम'' अंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेने प्रशासनात नावीन्यपूर्ण बदल घडवून आणत कृत्रिम बुद्धिमत्ता () चा वापर विविध विभागांमध्ये सुरू केला आहे. यामुळे नागरिक सेवा अधिक गतिमान, पारदर्शक आणि प्रभावी होण्यास मदत मिळत आहे.

मागील काही दिवसात एआयची मदत घेऊन कोण-कोणत्या विभागात कशापद्धतीने बदल घडवून कामाची गती वाढवता येईल त्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जात आहेत. मनपाच्या प्रत्येक विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून त्यांच्या विभागाचे काम कसे सुलभ करता येईल तसेच काय नावीन्यपूर्ण बदल करता येईल याचे पीपीटीद्वारे सादरीकरण आयुक्तांपुढे केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा कल्पक वापर करणाऱ्या विभागांना पुरस्कृत करण्यात येणार आहे.

बांधकाम विभाग,पाणी पुरवठा विभाग, यांत्रिकी, कोर्ट विभाग,जनसंपर्क विभाग, आस्थापना, निवडणूक, स्टोर विभाग, अतिक्रमण, नगर रचना, आरोग्य, स्वच्छता, ग्रंथालय, संगणक, शिक्षण विभाग, विद्युत विभाग, समाज कल्याण ,अग्निशमन विभाग इत्यादी सर्व विभागाद्वारे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापर मोठ्या प्रमाणावर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

AI ने शासकीय कामकाजाच्या टिपणी, पत्र, नोंद, संशोधन याबाबत मार्गदर्शन घेऊन काम जलद गतीने करण्यास मदत होते. वापर शासकीय पुस्तक, जीआर किंवा माहिती असलेले कागदपत्र अपलोड करुन संक्षिप्त प्रश्नांची उत्तरे जलद गतीने शोधुन मिळण्यास मदत होते. व चे वापर करून शासकीय कामकाजाचे पीपीटी करण्यास मदत होते आहे. वापर मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी निगडीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तसेच उपचार घेण्यासाठी फायदा होतो.

### नवीन तंत्रज्ञानाची कास धरत कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाची दिशा

१५० दिवस कार्यक्रम हे केवळ एक उद्दिष्ट नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बदल घडवण्याची दिशा आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करून प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**- आयुक्त विपीन पालीवाल**

## केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांच्यावतीने केंद्र पुरस्कृत मनरेगा योजनेतील लाभार्थ्यांच्या तक्रारींचा केल्या जाणार निपटारा!

### २० जुलै पर्यंत शिवसेना तालुका प्रमुखांपर्यंत लेखी स्वरुपात तक्रारी दाखल करण्याचे करण्यात आले आवाहन!!

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनीधी:** केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील लाभार्थींना येणाऱ्या समस्या व अडचणींचा निपटारा तात्काळ होऊन लाभार्थीपर्यंत या योजना सहज पोहचविण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यावतीने तक्रार निवारण शिबीर घेण्यात येणार आहे. या योजनेसंदर्भात काही तक्रारी असल्यास त्या लेखी स्वरुपात शिवसेना तालुका प्रमुखांकडे सादर कराव्यात. असे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन करण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्यावतीने (मनरेगा ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत येणारे विविध कामे प्रधानमंत्री आवास योजना, ( घरकुल ) सिंचन विहीर . गोठा बांधकाम योजने लाभ पोहोचवण्याचं लाभार्थींच्या काही तक्रारी असल्यास त्या तक्रारीचा तात्काळ निपटारा करुन योजनेचा लाभ लाभार्थ्या पर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यावतीने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व संबंधित विभागाच्या प्रमुखांच्या उपस्थितीत शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. ज्या नागरीकांच्या या योजनेसंदर्भात काही तक्रारी असतील त्या तक्रारी शिवसेनेच्या तालुका प्रमुखांकडे सविस्तर लेखी स्वरुपात स्वतःचे नाव व स्वतःचा मोबाईल नंबरसह सादर कराव्यात. तालुक्यातील तक्रारी या संबधित तालुक्याचे शिवसेना तालुका प्रमुख यांच्याकडे सादर कराव्यात. शिवसेना तालुका प्रमुखांचे दुरध्वनी क्रमांक याप्रमाणे बुलढाणा तालुका प्रमुख धनंजय बारोटे मो.नं.९५२७४८९४८०, मोताळा तालुका प्रमुख श्री.रामदास चौथनकर मो.नं. ९४२१९४५९९१, चिखली तालुका प्रमुख श्री.गजानन मोरे मो.नं.८९९९२५३६११, देऊळगांव राजा तालुका प्रमुख श्री.अनिल चित्ते मो.नं.९४२३०४८९८५, सिंदखेड राजा तालुका प्रमुख श्री.वैभव देशमुख मो.नं.९८२२९५४५३४, लोणार तालुका प्रमुख श्री.भगवान सुलताने मो.९८५०३३१०२१, मेहकर तालुका प्रमुख श्री.सुरेशतात्या वाळुकार मो. नं.९८९०३४९९९९, खामगांव तालुका प्रमुख श्री.राजेंद्र बघे मो.



नं.७०२०९३३१०५, शेगांव तालुका प्रमुख श्री.रामेश्वर थारकर मो. नं.९९२२४७४३८६, जळगांव जामोद तालुका प्रमुख श्री.अजय पारस्कार मो.नं.९९२२१४४१४६, संग्रामपुर तालुका प्रमुख श्री.केशवराव ढोकणे मो.नं.९६२३३३३४९४, नांदुरा तालुका प्रमुख श्री.सुनिल जुनारे मो. नं.९८५०५३३२६०, मलकापुर तालुका प्रमुख श्री.विजय साठे मो. नं.८३०८३७८१८२ यांच्याकडे तसेच मेहकर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालय आणि बुलढाणा येथील जिल्हाधिकारी येथील केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयात २० जुलै पर्यंत आपल्या तक्रारी सादर कराव्यात. असे आवाहन केंद्रीय मंत्री तथा शिवसेना नेते प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.